स्विकारल्याचा दिनांक : २५/०७/२०२२
नोंदणी दिनांक : २५/०७/२०२२
निकालाचा दिनांक : ०८/०५/२०२५
कालावधी : ०३ व., ०९ म., १३ दि.

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, माढा यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी व्ही.सी.क्षीरसागर)

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| | **नियमित फौजदारी खटला क्र.२८०/२०२२**<br>**नि.क्र.५५**<br>CNR No.:MHSO170021372022 |
| **गुन्ह्याचा तपशिल** | माढा पोलिस ठाणे, गुन्हा रजि. क्र.१४४/२०२२,<br>भा.दं.वि.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अंमलदार,<br>माढा पोलीस ठाणे, जि. सोलापूर |
| **तर्फे प्रतिनिधी** | सरकारी अभियोक्ता श्री. ए.पी.काळे |
| **आरोपी** | १. रुक्मीणी आप्पाराव गावडे, वय – ४७ वर्षे, धंदा – शेती |
| | २. गोवर्धन आप्पाराव गावडे, वय – ४७ वर्षे, धंदा – शेती |
| | ३. सोमा उर्फ सोमनाथ बाळू यादव, वय – ३२ वर्षे, धंदा – शेती<br>सर्व रा. भुताष्टे, ता. माढा, जि. सोलापूर |
| **आरोपींतर्फे प्रतिनिधी** | विधिज्ञ श्री. बी. जे. माने |

**प्रपत्र क्रं.३२ भाग 'ब'**

| **गुन्ह्याचा तपशिल** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | दि.०३/०७/२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | दि.०४/०७/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | दि.२५/०७/२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | दि.२८/०८/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | दि.२५/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | दि.०८/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | –– |

| आरोपींचा तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
| १ ते ३ | वरील प्रमाणे | फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस | – | भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |

## प्रपत्र क्रं.३२ भाग 'क'
## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | उत्तम पांडूरंग यादव | घटनास्थळ व जप्ती पंच | २१ |
| २. | प्रवीणकुमार शंकरकुमार दराडे | तपासिक अधिकारी | २९ |
| ३. | विजया रामचंद्र उर्फ रामहरी यादव | जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३५ |
| ४. | रामहरी नामदेव यादव | फिर्यादी | ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | राजकुमार देविदास यादव | घटनास्थळ व जप्ती पंच | ४४ |
| ६. | डॉ. सदानंद पांडूरंग वनकळस | वैद्यकीय अधिकारी | ४६ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| | नाही | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| | नाही | | |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी**

**अ. सरकारी**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३० | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |
| २. | ३१ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी केलेला पत्रव्यवहार |
| ३. | ३२ | आरोपींना फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे दिलेली नोटीस |
| ४. | ३३ | जखमींचे वैद्यकीयप्रमाणपत्र मिळणेकामी केलेला पत्रव्यवहार |
| ५. | ४१ | पोलिसांनी उपचारकामी दिलेली यादी |
| ६. | ४२ | फिर्याद |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | नाही | |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | नाही | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | एम. ओ.१ | एक कु–हाडीचा लाकडी दांडा |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०८ मे, २०२६)

प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुद्ध भा.दं.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**

२. दि.०३/०७/२०२२ रोजी दु.१२.३० वा. सुमारास फिर्यादी रामहरी नामदेव यादव व त्यांची पत्नी विजया असे बोअरचे मोटारची केबल जोडण्यासाठी शेतात गेले असता त्यांचे गावातील रुक्मीणी आप्पाराव गावडे, गोवर्धन आप्पाराव गावडे हे त्यांच्या शेतात मका पेरत होते. त्यावेळी त्यांनी त्यांना विचारणा केली की, 'तुम्ही आमचे शेतात का पेरणी करत आहात?' त्यावेळी गोवर्धन हा त्यांना 'हे आमचे शेत आहे, त्यामध्ये आम्ही पेरणी करु नाहीतर नागरु, तुम्हाला काय करायचे आहे?' असे म्हणून त्याने त्याचे हातातील कु–हाडीचे दांडयाने (लाकडी) फिर्यादीच्या पाठीवर उजवे बाजूस व डावे पायाचे गुडघ्यावर मारुन जखमी केले. त्यावेळी त्यांची पत्नी विजया ही भांडणे सोडविण्याकरिता आली असता तिला रुक्मीणी हिने ढकलून देऊन तिच्या पाठीत लाथा घातल्या. त्यावेळी ते ट्रॅक्टर चालक सोमा बाळू यादव यास 'तू आमचे रानातून ट्रॅक्टर काढ' असे म्हणताच तो त्यांना 'मी रानातून ट्रॅक्टर काढणार नाही.' असे म्हणून उलट त्याने त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी व त्याची पत्नी दोघेच असल्याने भितीपोटी

तेथून निघून तक्रार देण्यासाठी माढा पोलिस स्टेशन येथे गेले. पोलिसांनी त्यांना उपचारकामी यादी देऊन ग्रामीण रुग्णालय, माढा येथे पाठविले. तेथे त्यांनी प्राथमिक उपचार घेतले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तक्रार देण्यास पोलिस ठाण्यास जाण्यास सांगितले. परंतु, फिर्यादीचे पाठीत व गुडघ्यात दुखू लागल्याने त्यांनी लोंढे हॉस्पीटल, कुर्डूवाडी येथे उपचाराकामी दाखल झाले. तेथे माढा पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला.

३. सदर फिर्यादवरुन माढा पोलिस स्टेशन येथे आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्र.१४४/२०२२ भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचे तपास काम पोलिस हवालदार/४३५, पी. एस. दराडे यांनी केला. घटनास्थळ व जप्ती पंचमाना तयार केला. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती न्यायालयामध्ये आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.१२ वर दोषारोप ठेवण्यात आले. आरोपींना सदर दोषारोप वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी नि.क्र.१३ ते १५ वर सदर दोषारोप नाकारला व संपरिक्षेची मागणी केली. अभियोगपक्षास पुरेशी संधी देऊन देखील तसेच वारंवार साक्षीसमन्स काढून देखील इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवण्यास अपयशी ठरल्याने नाईलाजास्तव अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन निशाणी क्र. ५० ते ५२ प्रमाणे नोंदविण्यात आला. आरोपींनी बचावाप्रित्यर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही.

५. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा पाहता आणि सहाय्यक सरकारी वकिल श्री. ए. पी. काळे व आरोपींतर्फे वकिल श्री. बी. जे. माने यांचा युक्तीवाद ऐकून खालील मुद्दे माझ्या विचाराधीन निघत असून, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह देत आहे.

| **अ.नु.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दि.०४/०७/२०२२ रोजी दु.१२.३० वा. सुमारास मौजे भुताष्टे, ता. माढा, जि. सोलापूर येथील जमीन गट नं.७४ मध्ये आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.२ याने कु–हाडीच्या लाकडी दांडयाने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली? | नाही |
| २ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.१ हिने फिर्यादीच्या पत्नीस लाथाने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली? | नाही |
| ३ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस व साक्षीदारांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान केला, ज्यामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा यासाठी त्यांना प्रक्षोभित केले? | नाही |
| ४ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदांराना फौजदारी पात्र धकदपटशा करुन जीवे मारण्याची धमकी दिली? | नाही |
| ५ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### मुद्या क्र. १ ते ४ करिता

६. मुद्दे क्र. १ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेकरिता एकत्रीत घेण्यात आलेली आहेत.

७. अभियोगपक्षाचे केस नुसार दि.०४/०७/२०२२ रोजी दु.१२.३० वा. सुमारास मौजे भुताष्टे, ता. माढा, जि. सोलापूर येथील जमीन गट नं.७४ मध्ये आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.२ याने कु–हाडीच्या लाकडी दांडयाने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत तसेच आरोपी क्र.१ हिने फिर्यादीच्या पत्नीस लाथाने मारहाण करुन जखमी केले तसेच शिवीगाळ व दमदाटी केली, हे सिध्द करणे गरजेचे आहे. आरोपींवरील सदर दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर करण्यात आलेलया पुराव्याचे ऊहापोह करणे गरजेचे आहे.

८. अभियोगपक्षातर्फे आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. सा.क्र.१ उत्तम हे अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.०५/०७/२०२२ रोजी पोलिसांनी त्यांच्यासमक्ष भुताष्टे शिवारातील गट नं.७४ मध्ये त्यांना घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले व त्यांच्यासमक्ष घटनास्थळवरुन २९.५ इंच लांब कु–हाडीचा लाकडी दांडा जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केल्याचे नाकारले आहे. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे देऊन त्यांनी पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे.

९. सा.क्र.२ प्रवीणकुमार शंकरकुमार दराडे हे अभिलेखावरील तपासिक अधिकारी असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी सदर गुन्हयाचे तपासकाम केले. दि.०५/०७/२०२२ रोजी त्यांनी घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीने दाखविलेले हत्यार जप्त करुन एकत्रीतरित्या घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. लोंढे हॉस्पीटल तसेच ग्रामीण रुग्णालय, माढा येथे जखमीचे प्रमाणपत्र मिळणेकामी पत्रव्यवहार केला. आरोपी क्र.१ ते ३ यांना फौ.प्र.सं.कलम ४१/अ/१ अन्वये नोटीस दिली. आरोपीविंरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी घटनस्थळाच्या आजूबाजूस तुरळक लोकवस्ती असल्याचे कथन करुन आरोपींतर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तर सुचक प्रश्नांना त्यांनी

नकारार्थी उत्तरे दिले आहेत.

१०. सा.क्र.३ विजया यांनी त्यांच्या साक्षीमध्ये तीन वर्षांपूर्वी दु.१२.०० ते १.०० वा. सुमारास ती व तिचे पती शेतामध्ये जळालेली केबल काढण्याकरिता गेले असता आरोपी रुक्मीणी व तिचा मुलगा मका पेरण्यासाठी आले होते. त्यावेळी तिने त्यांना मका पेरु नका कोर्टामध्ये वाद चालू आहे असे म्हणाली. त्यावेळी रुक्मीणीच्या मुलाने तिचे पती रामहरी यांच्या उजव्या कानावरती, उजव्या हातावरती, उजव्या पायावरती काठीने मारले. ती भांडणे सोडविण्यासाठी गेली असता रुक्मीणीने तिच्या कानाखाली मारले. त्यानंतर ती तिच्या पतीला घेऊन लोंढे हॉस्पीटल येथे गेली. तेथे तिच्या पतीवर उपचार झाले. त्यानंतर तिच्या पतीला पुढील उपचारकामी सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे पाठविण्यात आल्याचे कथन केले आहे. तिने जप्त मुददेमाल एम.ओ.१ लाकडी काठी ओळखली आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी तिच्या सरतपासातील मजकूर की, 'रुक्मीणीच्या मुलाने तिचे पती रामहरी यांच्या उजव्या कानावरती, उजव्या हातावरती, उजव्या पायावरती काठीने मारले, रुक्मीणीने तिच्या कानाखाली मारले' हे तिच्या जबाबामध्ये नमूद नसल्याचे संयुक्तीक कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. तिने रुक्मीणीने तिच्या पतीविरुध्द दिवाणी दावा दाखल केल्याचे मान्य केले आहे. तिने मौजे भुताष्टे येथे गट क्र.७४/१/अ ही जमीन पूर्वी त्यांची असून आजरोजी सातबारा उता–यावरती तिचे व तिच्या पतीचे नाव नमूद नसल्याचे मान्य केले आहे. तिने तिच्या पतीने सदर जमीन समाधान लवटे, हणुमंत लवटे, रुक्मीणी गावडे, अमोल परबत व सैफन कुरेशी यांना विक्री केली असल्याचे नाकारल आहे. आरोपींतर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांना तिने नकारार्थी उत्तरे दिले आहेत.

११. अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार सा.क्र.४ फिर्यादी रामहरी यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.०३/०७/२०२२ रोजी दु.१२.३० वा. सुमारास ते व त्यांची पत्नी मोटारची केबल जोडण्याकरिता शेतामध्ये गेले असता तेथे गोवर्धन व रुक्मीणी त्यांच्या शेतामध्ये ट्रॅक्टर घेऊन येऊन मका पेरत होते. त्यावेळी त्यांनी त्यांना काय करत आहात. माझ्या शेतामध्ये का पेरत आहात. असे विचारले असता गोवर्धनने त्यांना कु–हाडीचे दांडक्याने पाठीवरती उजव्या बाजूस व डाव्या पायाच्या गुडघ्यावर मारले. त्यावेळी त्यांची पत्नी तेथे येऊन भांडणे का करत आहात असे विचारले असता रुक्मीणीने तिला ढकलून देऊन तिच्या पाठीवर लाथाने मारले. सोमा यादव

ट्रॅक्टर चालवत होता. विजया हिने सोमाला ट्रॅक्टर बाहेर काढण्यास सांगितले असता सोमाने ट्रॅक्टर काढणार नाही असे म्हणून शिवीगाळ केल्याचे कथन केले आहे. जप्त त्यांनी मुददेमाल एम.ओ.१ लाकडी काठी ओळखली आहे.

१२. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी त्यांची जमीन गावडे यांना विक्री केली नसल्याचे कथन करुन सातबारा उता–यावरती रुक्मीणी गावडे हिच्या नावाची नोंद असल्याचे व सध्या त्यांच्या नावे जमीन राहिले नसल्याचे मान्य केले आहे. त्यांनी रुक्मीणी हिच्याविरुध्द दिवाणी दावा तसेच सावकारी कायद्याखाली तक्रार दाखल केले असल्याचे व ते व त्यांची पत्नी साधारणतः पाच ते सहा दिवस दवाखान्यात उपचारकामी दाखल असल्याचे कथन केले आहे. त्यांनी रुक्मीणीने त्यांच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल केल्याचे तसेच त्यांना दाखविण्यात आलेली जप्त मुददेमाल लाकडी काठी त्यांनी पोलिसांना दिल्याचे मान्य करुन आरोपींतर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिले आहेत.

१३. सा.क्र.५ राजकुमार हे अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी दि.०५/०७/२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना भुताष्टे शिवारातील रामहरी यादव यांच्या शेतामध्ये घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलावले व घटनास्थळावरुन एक कु–हाडीचा लाकडी दांडा जप्त करुन एकत्रीतपणे घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, हे नाकारले आहे. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे देऊन त्यांनी पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे.

१४. सा.क्र.६ सदानंद पांडूरंग व्हनकळस हे अभिलेखावरील वैद्यकीय अधिकारी असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी दि.०३/७/२०२२ रोजी दु.३.५५ वा. व ३.५७ वा. सुमारास रामहरी व विजया यांना तपासले असून त्यांना रामहरीवरती पाठीवरती डाव्या खांद्याजवळ २ सेमी x २ सेमी आकाराची कंटयूजन जखम तसेच डाव्या गुडघ्यावरती २ सेमी x २ सेमी आकाराची कंटयूजन जखम आढळून आल्याचे सदर जखमा हया साध्या स्वरुपाचे असून त्यांचे वय १२ तासांच्या आतील असल्याचे कथन केले आहे. त्यांनी विजया हिच्यावरती पाठीवरती २ सेमी x २ सेमी आकाराची कंटयूजन जखम आढळून आल्याचे सदर जखमा हया साध्या स्वरुपाचे असून त्यांचे वय ६ तासांच्या आतील असल्याचे कथन केले आहे. वर नमूद जखमा हया कठीण व

बोथट अवजाराने होऊ शकत असल्याचे कथन केले आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी रामहरी यांच्या गुडघ्यावरती तसेच पाठीवरती कोणतीही बाहय जखम आढळून आली नसल्याचे जखमांचे रंग वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद नसल्याचे तसेच वर नमूद वैद्यकीय प्रमाणपत्रांमधील जखमा अपघातामध्ये होऊ शकत असल्याचे मान्य केले आहे.

१५. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार सा.क्र.४ फिर्यादी रामहरी हे अभिलेखावरील जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांनी फिर्यादप्रमाणे कथन करुन फिर्याद सिध्द असले तरी त्यांनी आरोपींनी त्यांना कोणत्या शब्दांमध्ये शिवीगाळ व दमदाटी केली याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. त्यांनी सदर घटना त्यांच्या शेतामध्ये नेमकी कोठे घडली याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. त्यांच्या साक्षीवरुन रुक्मीणी हिने त्यांची पत्नी विजया हिला ढकलून देऊन तिच्या पाठीवरती लाथाने मारल्याचे दिसून येते. परंतु, सा.क्र.३ विजया हिने याबाबत तिच्या साक्षीमध्ये काहीही कथन न करता सदर बाब वगळलेले दिसून येते. सा.क्र.३ विजया हिने तिच्या साक्षीमध्ये रुक्मीणीने तिला कानाखाली मारल्याचे सांगत सुधारणा केल्याचे दिसून येते. फिर्यादीच्या साक्षीवरुन आरोपींने त्यांना पाठीवरती उजव्या बाजूस व डाव्या गुडघ्यावरती मारलयाचे दिसून येते. वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन फिर्यादीच्या पाठीवरती उजव्या बाजूस कोणतीही जखम आढळून येत नाही. सा.क्र.३ विजया हिने तिच्या साक्षीमध्ये आरोपीने तिच्या पतीस उजव्या कानावरती, उजव्या हातावरती व उजव्या पायावरती मारल्याचे कथन करत सुधारणा केल्याचे दिसून येते. फिर्यादी व सा.क्र.३ विजया हे अभिलेखावरील जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून देखील त्यांच्या साक्षीमध्ये त्यांना झालेल्या जखमांच्या अनुषंगाने तफावत व विसंगती दिसून येते. फिर्यादी व सा.क्र.३ विजया हिच्या साक्षीमध्ये सुधारणा, ओमिशन, तफावत व विसंगती दिसून येत असल्याने त्यांची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही.

१६. फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांच्या अभिलेखावरील पुराव्याच्या अनुषंगाने अभिलेखावरील वैद्यकीय पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. सा.क्र.६ डॉ. सदानंद व्हनकळस यांच्या साक्षीवरुन त्यांनी दि.०३/०७/२०२२ रोजी दु.३.५५ वा. व ३.५७ वा. सुमारास रामहरी व विजया यांना तपासले असून त्यांना रामहरीवरती पाठीवरती डाव्या खांद्याजवळ २ सेमी x २ सेमी आकाराची कंटयूजन जखम व डाव्या गुडघ्यावरती २ सेमी x २

सेमी आकाराची कंटयूजन जखम तसेच विजया हिच्यावरती पाठीवरती २ सेमी x २ सेमी आकाराची कंटयूजन जखम आढळून आल्याचे दिसून येते. फिर्यादी रामहरी यांच्या साक्षीवरुन त्यांच्या पाठीवरती उजव्या बाजूस मारहाण झाल्याचे दिसून येते. परंतु, वैद्यकीय पुराव्याप्रमाणे फिर्यादीच्या डाव्या बाजूस जखम दिसून येते. तसेच विजया हिच्या गालावरती मारले असल्याचे दिसून येते. परंतु, विजयाच्या पाठीवरती जखम आढळून येते. त्यामुळे फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांना झालेल्या जखमां तसेच वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद जखमा यामध्ये तफावत व विसंगती दिसून येते. वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षीवरुन त्यांनी दि.०३/०७/२०२२ रोजी दु.३.५५ वा. व दु.३.५७ वा. सुमारास म्हणजे घटनेनंतर तीन तासांनी रामहरी व विजया यांना तपासल्याचे दिसून येते. परंतु, वैद्यकीय पुराव्यावरुन त्यांना झालेल्या जखमांचे वय अनुक्रमे १२ व ६ तासाच्या आतील असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर जखमा घटनेपूर्वी झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांचा पुरावा व अभिलेखावरील वैद्यकीय पुरावा एकमेकांशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांना झालेल्या जखमां हया तथाकथित घटनेवेळी आरोपींनी मारल्यामुळे झाल्या याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही.

१७. अभिलेखावरुन फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये जमीन विक्री केल्याबाबत वाद असून फिर्यादी व आरोपी यांनी एकमेकांविरुध्द दिवाणी दावे दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये पूर्व वैमनस्य व तणावपूर्ण संबंध असल्याचे दिसून येते. अभिलेखावर एकही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे फिर्यादीच्या साक्षीस कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या साक्षीची पुष्टी मिळत नाही. फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांच्या साक्षीमध्ये सुधारणा, ओमिशन, तफावत व विसंगती दिसून येत असल्याने तसेच फिर्यादी व आरोपींमध्ये पूर्व वैमनस्य व तणावपूर्ण संबंध पाहता फक्त फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांच्या साक्षीवरती भिस्त ठेवणे योग्य व न्यायोचित होणार नाही.

१८. सा.क्र.१ उत्तम व सा.क्र.५ राजकुमार हे अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा निसंशय सिध्द होत नाही. सा.क्र.४ फिर्यादी यांच्या साक्षीवरुन जप्त मुददेमाल लाकडी काठी त्यांनी पोलिसांना दिल्याचे दिसून येते. त्यामुळे तपासिक अधिकारी यांनी

घटनास्थळावरुन लाकडी काठी जप्त केली यासंदर्भाने कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. तपासिक अधिकारी यांची साक्ष तांत्रीक स्वरुपाची असून त्यांनी केलेल्या तपासाशी निगडीत असल्याने त्यांच्या साक्षीचा फारसा उपयोग अभियोगपक्षास होत नाही.

१९. अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरुन फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये जमीनीच्या विक्रीसंदर्भाने वाद असून त्यांच्यात तणावपूर्ण संबंध असल्याचे दिसून येते. फिर्यादीने किंवा एकाही साक्षीदाराने आरोपींनी कोणत्या शब्दात दमदाटी व शिवीगाळ केली याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. फिर्यादी व सा.क्र.३ विजया हे अभिलेखावरील जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून देखील त्यांच्या साक्षीमध्ये त्यांना झालेल्या जखमांच्या अनुषंगाने तफावत व विसंगती दिसून येते. त्यामुळे फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांचा पुरावा व अभिलेखावरील वैद्यकीय पुरावा एकमेकांशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांना झालेल्या जखमां हया तथाकथित घटनेवेळी आरोपींनी मारल्यामुळे झाल्या याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. सा.क्र.१ उत्तम व सा.क्र.५ राजकुमार हे अभिलेखावरील घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा निसंशय सिध्द होत नाही. सा.क्र.४ फिर्यादी यांच्या साक्षीवरुन जप्त मुददेमाल लाकडी काठी त्यांनी पोलिसांना दिल्याचे दिसून येते. त्यामुळे तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळावरुन लाकडी काठी जप्त केली यासंदर्भाने कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांच्या साक्षीमध्ये सुधारणा, ओमिशन, तफावत व विसंगती दिसून येत असल्याने तसेच फिर्यादी व आरोपींमध्ये पूर्व वैमनस्य व तणावपूर्ण संबंध पाहता फक्त फिर्यादी व सा.क्र.३ विजया यांच्या साक्षीवरती भिस्त ठेवणे योग्य व न्यायोचित होणार नाही. त्यामुळे आरोपींनी दोषारोपात नमूद गुन्हा केला, हे निसंशय सिध्द होत नाही.

२०. वरील चर्चेवरुन सदर तथाकथित घटनेवेळी दि.०४/०७/२०२२ रोजी दु.१२.३० वा. सुमारास मौजे भुताष्टे, ता. माढा, जि. सोलापूर येथील जमीन गट नं.७४ मध्ये आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.२ याने कु–हाडीच्या लाकडी दांडयाने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत तसेच आरोपी क्र.१ हिने फिर्यादीच्या पत्नीस लाथाने मारहाण करुन

जखमी केले तसेच शिवीगाळ व दमदाटी केली, हे सिद्ध झालेले नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे निसंशय सिद्ध होत नाही. आरोपींविरुद्धचा दोषारोप निसंशयपणे सिद्ध होईपर्यत आरोपी निर्दोष आहे हे फौजदारी कायदयाचे मुळ गृहीतक आहे. एकंदरीत आरोपींविरुद्धचा दोषारोप निसंशयपणे सिद्ध होत नाही व संशयाचा फायदा आरोपींना जातो. त्यामुळे मुद्या क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. मुद्या क्र.५ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ रुक्मीणी आप्पाराव गावडे, क्र.२ गोवर्धन आप्पाराव गावडे व क्र.३ सोमा उर्फ सोमनाथ बाळू यादव यांची भा.दं.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व पुर्वी दिलेला जामीन रद्य करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमाल एक कु–हाडीचा लाकडी दांडा हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे. |
| ४. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कालावधीकरिता प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका द्यावे. |
| ५. | सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांना फौ.प्र.सं. कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायासनावर निवेदित व घोषीत)

VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Digitally signed by VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Date: 2026.05.08 17:46:56 +0530

(व्ही.सी.क्षीरसागर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, माढा

दि.०८/०५/२०२६

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | N. B. Kamurti |
| Court Name | : | Smt. V.C. Kshirsagar<br>2nd Jt.CJJD & JMFC, Madha |
| Date of Order/Judgment | : | 08/05/2026 |
| Order/judgment signed by presiding officer on | : | 08/05/2026 |
| Order/judgment uploaded on | : | 08/05/2026 |